बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बीड | गुरूवार,दि.२६सप्टेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक५५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

### सोलापूर विमानसेवेचा प्रारंभ

सोलापूर : सोलापूरच्या बहुप्रतीक्षित नागरी विमानसेवेला मुहूर्त अखेर मिळाला असून येत्या २६ सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पुण्यात दूरदृश्य प्रणालीद्वारे सोलापूरच्या नागरी विमानसेवेचा शुभारंभ होणार आहे. आगामी विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यात विविध विकासकामांच्या शुभारंभासह भूमिपूजनांचा धूमधडाका सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून सोलापूर विमानसेवेचा शुभारंभ घाईगडबडीत उरकला जात आहे. केंद्र सरकारने यापूर्वी १५ जून २०१६ रोजी उडान योजनेअंतर्गत पहिल्या टप्प्यातच सोलापूर विमानसेवेला मंजुरी दिली होती. परंतु त्या अनुषंगाने सोलापूरच्या छोटेखानी विमानतळावर आवश्यक सुविधांचा अभाव असल्याने उडान योजना सोलापूरकरांसाठी कागदावर राहिली होती. त्यानंतर सुमारे सात वर्षे विमान सेवेबाबत फारशा हालचाली झाल्या नव्हत्या.

# धनुभाऊंचा गड धोक्यात, ढीगभर कार्यकर्ते राष्ट्रवादीत झाले दाखल!



## खा.बजरंग सोनवणे म्हणाले परळीचा आमदार आपलाच असेल

## राजाभाऊ फडसह भाजप, राष्ट्रवादी, शिंदे गटाचे कार्यकर्ते शरदचंद्र पवार गटात

बीड,परळी,केज/पुण्यभूमी टीम

बीडच्या जनतेने लोकसभा निवडणूकीत इतिहास घडविला. त्यामुळे माझ्यासारखा सामान्य माणूस खासदार झाला.अगदी त्याचप्रमाणे येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीतही परळी मतदार संघात त्याची पुनरावृत्ती घडवून आणायची आहे.त्यासाठी राजाभाऊ फड आणि पक्षप्रवेश केलेल्या असंख्य कार्यकर्त्यांना सोबत घेवून हा बदल निश्चित घडवून येईल. परळीचे राजकारण आज घडीला दबाव तंत्राचे आहे.त्यामुळे जनताही या दबाव तंत्राला कंटाळली आहे.परळी मतदार संघातील कार्यकर्त्यांचा आजचा हा पक्षप्रवेश सोहळा उद्याच्या विधानसभा निवडणुकीत पोषक ठरणार आहे. यावेळी खा. बजरंग सोनवणे असेही म्हणाले की, अजून बरेच आजी-माजी पक्षप्रवेश करणार आहेत. त्यामुळे बीड जिल्ह्यातल्या सहाही मतदार संघातील चित्र वेगळे राहणार असून पुन्हा एकदा राष्ट्रवादी शरद पवार गटाचे वर्चस्व असेल. असे सुतोवाचक विधान खा.बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केले.



## जनतेने लोकसभेत जागा दाखवून दिली आता विधासभेत थांबा लागणार!

## जिल्ह्यातले दिग्गज आजी-माजी राष्ट्रवादीत करणार प्रवेश?

### यांनी केला जाहीर प्रवेश

परळी मतदार संघातील राजकीय वलय असलेले राजाभाऊ फड यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात जाहीर प्रवेश केला. त्यामध्ये भाजपाच्या बीड जिल्हा सरचिटणीस मंगलताई सोळंके, भाजप माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद किरवले, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संघटक डॉ.जान शेख, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उद्योजक विक्रम देशमुख,भाजपच्या नागापूरच्या माजी सरपंच अश्विनी सोळंके, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे पद्माकर लहाने, माजी सरपंच कुसुमताई शिंदे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी सरपंच सतीश फुंडकर, माजी उपसरपंच दत्तात्रय कदम यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे माजी युवा प्रदेशाध्यक्ष, नेते राजेभाऊ फड यांनी मुंबई येथे दि २५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. राष्ट्रवादीतील फुटीनंतर परळीचे आमदार असलेल्या धनंजय मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना साथ दिली. त्यामुळे या मतदारसंघात शरद पवार हे नवीन चेहऱ्याच्या शोधात असून इतर पक्षातील नेत्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी प्रयत्नशील आहेत. दरम्यान शरद पवार यांच्यासह राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, महिला आघाडीच्या राष्ट्रीय अध्यक्षा फौजिया खान, खा सुप्रिया सुळे, आ जितेंद्र आव्हाड, आ रोहित पवार, बीडचे खा.बजरंग सोनवणे, बीडचे आ संदीप क्षीरसागर यांच्या उपस्थितीत राजेभाऊ फड यांनी आपल्या समर्थकांसह हाती तुतारी घेतली.

### मुंडेंच्या परळीत पवारांची मोर्चेबांधणी



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्यावर विश्वास ठेवून परळी मतदार संघातील असंख्य कार्यकर्त्यांनी बुधवार (दि.२५) रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यालयात शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्ष प्रवेश केला.यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले की, ज्यांचा आज पक्षप्रवेश होतो आहे, ती असामी साधीसुधी नाही. गेल्या २५ वर्षांपासून कन्हेरवाडी ग्रामपंचायत त्यांच्या ताब्यात आहे.सरपंच संघटनेचे अध्यक्ष म्हणून कार्यकरत होते. परळी मार्केट कमिटीत मोठ्या मताधिक्याने संचालक म्हणून निवडून आलेले आहेत.यापूर्वी रासपचे युवक प्रदेश अध्यक्ष होते. कोणतीही अट न घालता त्यांनी आज राष्ट्रवादी शरद पवार गटात आपल्या असंख्य कार्यकर्त्यांना सोबत घेऊन प्रवेश केला आहे. त्यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे आम्ही मनः पूर्वक अभिनंदन आणि स्वागत करतो. परळी मतदार संघातील एखादा कार्यकर्ता प्रवेश करत असेल तर त्याला फोन करुन दाब दिला जातो.खरंतर परळीच्या नेत्यांची ही जुनी खोड आहे. शरद पवार यांचा नाद करायचा नाही.कारण विधानसभा निवडणूकपूर्वीच बीडच्या जनतेने लोकसभेत ज्याला त्याची जागा दाखवून दिली आहे.लोकसभेच्या निवडणुकीत मत केंद्रावर कोण कसे वागले हे अवघ्या महाराष्ट्राला माहित आहे. आम्ही शांत आहोत जर एकएक माहिती बाहेर काढली तर सुळो की पळो होईल.असा टोलाही खा.बजरंग सोनवणे यांनी परळीच्या नेत्याचे नाव न घेता लगावला. या पक्षप्रवेश सोहळ्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार,खा.फौजिया खान, राजेंद्र पवार, संजीवनी देशमुख यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्षय शिंदेचा दफनविधी नाहीच

## नातेवाईकांना धमक्या: वडिलांचा फोन बंद; वकील अमित कटारनवरेंचा दावा



ठाणे/पुण्यभूमी प्रतिनिधी

बदलापूर लैंगिक अत्याचारातील आरोपी अक्षय शिंदे याचा ठाणे पोलिसांकडून एन्काऊंटर करण्यात आला. या घटनेनंतर पोलिसांच्या कारवाईवर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. विशेष म्हणजे याप्रकरणी अक्षयच्या वडिलांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून तातडीने सुनावणीही देखील सुरू झाली आहे. न्यायालयात आज झालेल्या सुनावणीत हायकोर्टाने पोलिसांच्या भूमिकेवर काही प्रश्न उपस्थित केले आहेत. तर, याप्रकरणी त्यांच्या समाजातील रितीरिवाजाप्रमाणे आपण अक्षयचा अंत्यविधी करताना त्याचा मृतदेह जाळण्याऐवजी दफन करण्याचं ठरवल्याचं त्याच्या नातेवाईकांकडून सांगण्यात येत आहे. मात्र, आतापर्यंत आरोपी अक्षयचा दफन विधी होणे अपेक्षित होते, पण अद्याप दफन विधी का झाला नाही, असा सवाल उपस्थित करत वकील अमित कटारनवरे यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत.

अक्षय शिंदेच्या आई वडिलांना चौकशीसाठी पोलिस घेऊन गेले असून अक्षयच्या पान २ वर...

# कमला हॅरिसां प्रचार कार्यालयावर गोळीबार

## देशविदेश:अमेरिका पोलिसांकडून घटनेचा तपास सुरू

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

अमेरिकन नागरिक आपल्या पुढील राष्ट्राध्यक्षांची निवड करण्यासाठी ५ नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान करतील. खरं तर या निवडणुकीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले आहे. सध्या अमेरिकीत प्रशासकीय अधिकारी हे निवडणूक कर्मचाऱ्यांची सुरक्षा, मतदानासंदर्भातील प्रक्रियेची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी उपाययोजना करत आहेत. अशातच अमेरिकेत राजकीय हिंसाचार वाढत असल्याच्या काही घटना समोर येत आहेत. काही दिवसांपूर्वी माजी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यावर जीवघेणा हल्ला झाला होता. यानंतर आता अमेरिकेतील रिझोना येथे डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस यांच्या प्रचार कार्यालयात गोळीबार झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी या घटनेला दुजोरा दिला असून मध्यरात्रीनंतर अज्ञातांनी गोळीबार केल्याची प्राथमिक माहिती काही माध्यमांच्या वृत्तामधून समोर आली आहे. मात्र, ज्यावेळी कार्यालयात गोळीबार झाला, त्यावेळी त्या ठिकाणी कोणीही नव्हतं. त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, यानंतर आता कमला हॅरिस यांच्या प्रचार कार्यालयात काम करणाऱ्यांच्या सुरक्षेसंदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. या घटनेनंतर तपास यंत्रणा घटनास्थळी जाऊन घटनेचा तपास करत आहेत. तसेच पान २ वर...



### ट्रम्प यांच्यावरही हल्ला झाला होता

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर दोन वेळा हल्ला झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर एका व्यक्तीला तातडीने अटक करण्यात आली होती. त्याआधी डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पेनसिल्व्हेनियामध्ये एका रॅलीदरम्यान गोळीबार करण्यात आला होता. ज्यामध्ये ते थोडक्यात बचावले होते.

# आमदारांच्या टक्केवारीमुळेच दर्जाहीन कामे

## डॉ.योगेश क्षीरसागर:जालना रोड गेला पाण्याखाली



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

गत पाच वर्षांच्या कार्यकाळात बीडच्या आमदारांना एक काम धड करता आले नाही. जे केले त्या कामांमध्ये ठेकेदारांकडून वाट्टेल तितकी टक्केवारी घेतल्याने कामे दर्जाहीन झाली. याचा उत्तम नमुना म्हणून जालना रोडच्या कामाकडे पाहता येईल. एका पावसात शहरातील हा रस्ता पाण्याखाली जात असून नागरिकांना होत असलेल्या त्रासाला बीडचे आमदारच सर्वस्वी जबाबदार आहेत, असा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला आहे.

पत्रकात पुढे म्हटले आहे की, बीड शहरातून जाणार्या जालना रोडवरील जनता गॅरेजपासून साई पॅलेसपर्यंत करण्यात आलेला रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा झालेला आहे. हे काम आमदारांनी श्रेय लाटण्यासाठी हस्तक्षेप करून घाईघाईत करून घेतले. परंतु, वाट्टेल तितकी टक्केवारी घ्यायची सवय झाल्याने या कामात डिव्हायडर उभारण्यात आले नाही. दुतर्फा नाल्या करण्यात आल्या नाहीत. परिणामी, झालेल्या पावसाने पाणी व्यवसायिकांच्या पान २ वर...

**अभिनंदनिय** पुणे येथे विशेष सन्मान पुरस्कार देवून केला गौरव

# जमियत उलमा संघटनेकडून मयुरीताई मस्के-खेडकर सन्मानित!

गेवराई /पुण्यभूमी प्रतिनिधी

जमियत उलमा-ए-हिंद ही भारतीय मुस्लिमांची सर्वात जुनी आणि सर्वात मोठी सामाजिक धार्मिक संघटना आहे.या संघटनेकडून गेवराई मतदार संघातील प्रसिद्ध समाजसेविका मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन विशेष सन्मान पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार आपल्याला ऊर्जा आणि प्रेरणा देत राहील, मला मिळालेला पुरस्कार हा माझ्यासोबत काम करणारे मला मदत करणारे या सर्वांना समर्पित करते, असे उदगार सन्मान स्वीकारताना मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी व्यक्त केले.





समाजामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा जमियत उलमा पुणे यांच्याकडून गौरव करण्यात येतो यावर्षी गेवराई मतदार संघाच्या प्रसिद्ध समाजसेविका मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांचा विशेष सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला आहे.हा सन्मान सोहळा पुणे येथील पारगाई लॉन, कोंढवा येथे नुकताच पार पडला. खा.मौलाना मोहिबुल्ला नदवी व प्रमुख पाहुणे जळगावचे मुफ्ती हारून नदवी यांच्या हस्ते विशेष गौरव पुरस्कार सोहळा संपन्न झाला.

मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी आपल्या भागात ५ हजाराहून अधिक गरीब लोकांच्या डोळ्यांचे मोफत ऑपरेशन करून त्यांना दृष्टी देण्याचे महान कार्य केले आहे. ३९०० नागरिकांना मोफत शिर्डी यात्रा, सोळाशे नागरिकांना मोफत पंढरपूर तुळजापूर येडेश्वरी यात्रा, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, पान २ वर...

# काँग्रेसच्या डीएनएमध्येच आरक्षणविरोध

## कार्यक्रम: नरेंद्र मोदींचा सोनीपतमध्ये हल्लाबोल!

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या राज्यात प्रचारसभा घेत आहेत. सोनीपतमध्ये बुधवारी झालेल्या प्रचारसभेत नरेंद्र मोदींनी काँग्रेसला लक्ष्य केलं. काँग्रेसच्या १० वर्षांपूर्वीच्या कारभारावर टीका करताना मोदींनी भ्रष्टाचाराला काँग्रेसनंच जन्म दिल्याचा उल्लेख केला. तसेच, यावेळी त्यांनी काँग्रेसच्या डीएनएमध्येच आरक्षण विरोध असल्याचंही विधान केलं. पुढील महिन्यात ५ ऑक्टोबर रोजी हरियाणामध्ये एकाच टप्प्यात मतदान होत असून ८ ऑक्टोबरला हरियाणा व जम्मू-काश्मीरसाठीची मतमोजणी पार पडेल. पान २ वर...




### आरक्षणविरोध काँग्रेसच्या डीएनएमध्ये

काँग्रेसच्या शाही परिवारातून जो कुणी पंतप्रधान झाला, त्यानं आरक्षणाला विरोध केला. आरक्षणाला विरोध काँग्रेसच्या डीएनएमध्ये आहे. त्यामुळेच आजही काँग्रेसच्या शाही कुटुंबातली चौथी पिढीदेखील आरक्षणाला हटवण्याची चर्चा करते, अशी टीकाही त्यांनी केली.

# बुल्स इन चायना शॉप्स!


तक्रारदाराने आरोपीस शिक्षा करण्याचा अधिकार स्वत:कडे घेणे आणि आवश्यक त्या किमान प्रक्रिया डावलून अशी 'शिक्षा' करणे म्हणजे एन्काउंटर. जे बदलापूरबाबत घडले. या अशा शिक्षा करण्याच्या अधिकाराचे राष्ट्रव्यापी, राष्ट्रवादी प्रारूप म्हणजे इस्त्रायल आणि या 'शिक्षेचा' ताजा आविष्कार म्हणजे त्या देशाने लेबनॉनवर लादलेले युद्ध. या दोन्हींमागील मानसिकता तीच. हे सत्य बदलापूरप्रकरणी स्वीकारणे काहींस जड जाईल. पण ती त्यांच्या असंस्कारित बुद्धीची मर्यादा असेल. या प्रकरणी पोलिसांस स्वसंरक्षणार्थ गोळीबार करावा लागला, असे सांगितले जाते. तो विनोदाचा अतिशयोक्ती अलंकार. त्यावर केवळ विचारशून्यांचाच विश्वास बसेल. या आरोपीने पोलिसांवर त्यांच्याच बंदुकीतून हल्ल्याचा प्रयत्न केला, हा दावा. तो किती हास्यास्पद आहे हे लक्षात घेण्यासाठी सदर परिस्थिती पाहा. पोलीस आणि हा आरोपी हे मोटारीत होते, अशात पोलिसांची बंदूक (की रिव्हॉल्वर/पिस्तूल) ओढून घेण्यासाठी आवश्यक ती जागा त्यास कशी मिळाली? हे शस्त्र ओढत असताना पोलीस हे ओढणे काय पाहत होते का? समजा त्याने खरोखरच ते ओढले हे मान्य केले तरी त्यातून गोळी मारण्यासाठी काही प्रयत्न करावे लागतात, ते 'अनलॉक' करणे, मग विशिष्ट पद्धतीने धरणे इत्यादी सर्व तंत्र शालेय शिपाई आरोपीस माहीत होते असा सरकारच्या म्हणण्याचा अर्थ आणि त्यावर जनसामान्यांनी विश्वास ठेवावा असा त्यांचा आग्रह. ठेवणारे ठेवोत. या प्रकरणी आरोपीबाबत एका पैचीही सहानुभूती बाळगावी अशी परिस्थिती नाही हे मान्य. पण म्हणून 'असा न्याय' करण्याचा अधिकार सरकारला आहे, हे कसे मान्य करणार? हे; या एन्काउंटरच्या सुवार्तेने आनंदित होऊन पेढे वाटणाऱ्यांस मान्य असेल तर यांच्यातील काहींचे आर्थिक गैरव्यवहार, जमीन बळकावप्रकरणीही 'असाच' न्याय होणे त्यांस मान्य असेल काय? यात एक गुन्हेगार गेला याचे दु:ख नाही. तर त्यास 'घालवण्याची' पद्धत बिनगुन्हेगारी होती असे म्हणता येत नाही आणि अशा संशयास्पद मार्गाचा अवलंब करणारे सरकारच आहे हे अधिक वेदनादायक आहे. या घटनेचे स्वागत होत असेल तर सुसंस्कारित समाजनिर्मितीच्या पहिल्याच पायरीवरचा आपला मुक्काम किती लांबतो आहे, हा प्रश्न.या 'एन्काउंटरी' मानसिकतेचा आंतरराष्ट्रीय सांधा इस्त्रायलच्या ताज्या हल्ल्याशी सहज जोडता येईल. इस्त्रायलने लेबनॉनवर केलेल्या ताज्या हल्ल्यात आतापर्यंत साधारण ५०० जण ठार झाले. इस्त्रायलचे लेबनॉनशी कोणतेही युद्ध नाही. परंतु हेजबोल्ला या इराण-समर्थक दहशतवाद्यांनी लेबनॉनमध्ये आश्रय घेतला हा इस्त्रायलचा दावा. तेव्हा हेजबोल्लाच्या दहशतवाद्यांना आसरा देणाऱ्यांना शिक्षा देण्यासाठी म्हणून आपण लेबनॉनवर हल्ला करत असल्याचा त्या देशाचा खुलासा. या हल्ल्यात जे मेले त्यात बहुतांश हे लेबनीज नागरिक आहेत. ते हेजबोल्लाचे आश्रयदाते होते किंवा काय याचा कोणताही पुरावा इस्त्रायलकडे नाही. तथापि असा काही पुरावा इस्त्रायलकडे नाही, हे आश्चर्य नाही. तर आपले म्हणणे सिद्ध करण्यासाठी अशा काही पुराव्याची आपणास गरज आहे असे त्या देशास वाटतही नाही हे २१ व्या शतकातील आश्चर्य आहे. इतकेच नव्हे तर अनेक लेबनीज घरांत विमानवेधी तोफा, क्षेपणास्त्र डागणारी यंत्रणा तैनात करण्यात आलेली आहे, असेही इस्त्रायल म्हणते. याचा बीमोड करण्यासाठी केलेल्या हल्ल्यात किती ठिकाणी अशी यंत्रणा खरोखरच होती किंवा काय याचा तपशील उपलब्ध नाही. गत सप्ताहात इस्त्रायलने त्या देशात पेजर आणि वॉकीटॉकीचे स्फोट घडवून वीस-पंचविसांचे प्राण घेतले. हेजबोल्लाच्या सदस्यांकडे हे पेजर होते आणि त्यांचा स्फोट घडवून आणला गेला, असे त्या देशाचे म्हणणे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील साधा संकेत असा की सामान्यांच्या दैनंदिन वापराच्या वस्तूंचे रूपांतर शस्त्रास्त्रांत करू नये. याचे कारण जनसामान्यांचे जगणे त्यातून अवघड होते. इस्त्रायलला या अशा संकेतपालनाची कोणतीही गरज वाटत नाही. दुसरे असे की या अशा प्रकारच्या कृत्यांतून ज्यांचा या सगळ्यांशी काहीही संबंध नाही त्यांचेही हकनाक प्राण जातात. म्हणजे या प्रकरणी कथित हेजबोल्ला समर्थकाच्या हातातील संपर्क यंत्रणेचा स्फोट घडवून त्याचा काटा काढला जात असताना रस्त्यावरील वा त्याच्या शेजारील सहप्रवाशाचाही जीव जातो. पण हे असे विनाकारण जीव घेणे वाईट यावर इस्त्रायलचा विश्वास नसावा. अन्यथा गेल्या ऑक्टोबरात हमासने इस्त्रायलवर जो ११०० जणांचा बळी घेणारा हल्ला केला, त्याचे प्रत्युत्तर देताना जे ४८ हजार बळी गेले, त्यानंतर तरी शस्त्रसंधी करावा असे इस्त्रायलला वाटले असते.

# जीवनाचे समग्र तत्त्वज्ञान मांडले

## डॉ.कमलकिशोर लड्डा : पंडित दीनदयाळ उपाध्यायांना अभिवादन

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ विभागाकडून पंडित दीनदयाळ उपाध्याय यांना त्यांच्या जयंती प्रसंगीचे औचित्य साधून अभिवादन करण्यात आले.



याप्रसंगीच्या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. कमलकिशोर लड्डा म्हणाले की, युवकांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या समग्र विचारांचा आदर्श आपल्या जीवनामध्ये अंगी करावयास हवा. कारण त्यांचे संपूर्ण जीवन हे खूप संघर्षमय असे राहिले आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये कार्य करत असताना आजची जी भारतीय जनता पार्टी आहे तो पूर्वीचा जनसंघ याला विकसित करण्याचे कार्य खऱ्या अर्थाने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी अतिशय परिश्रमपूर्वक केले आहे. अतिशय शालीन स्वभावाचे, बोलण्यात मृदुता, आणि बिडस्त प्रतिभावंत, चिंतक असे अभिजात व्यक्तिमत्व म्हणजेच पंडित दीनदयाळ उपाध्याय होय. आपल्या सांस्कृतिक परंपरेत जगाला देण्यासारखे काय आहे याचा विचार करून जागतिक प्रगतीच्या कार्यात सहभागी झाली पाहिजे. गेली हजार वर्षे आपले संपूर्ण आयुष्य हे स्वातंत्र्य लढ्यात व स्वसंरक्षणात गुंतले असल्याने जगातील इतर राष्ट्रांच्या बरोबरीने आपण उभे राहू शकलो नाहीत तर आपले भविष्य हे खूप अंधकारमय राहील असा विचार ते नेहमीच ते मांडत राहत. अशा या व्यक्तीचा आदर्श युवकांनी त्यांचे तत्त्वज्ञान वाचून, त्यांची वेगवेगळी पुस्तके वाचून आपल्या जीवनात अंगीकारावा असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ.युवराज मुळये म्हणाले की, भारतीय जीवनाचे चिंतन परंपरा व तत्त्वज्ञान यांचा संपूर्ण विचार आपल्या एकात्म मानव विचार दर्शनामध्ये सापडतो हे एकात्म मानववादाचे तत्त्वज्ञान आपल्या जीवनामध्ये अंगीकारायचे हा विचार पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनीच जगाला संपूर्ण देशाला सांगितला. त्यांच्या वेगवेगळ्या समाज व राष्ट्रकार्याचे आजही समाजात स्वागतच होत आहे असे ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे समन्वयक डॉ. सुनील पाटील यांनी केले. सूत्रसंचालन डॉ जिजाराम बागल यांनी केले. तर आभार डॉ. गंगाधर उषमवार यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती.

# आंदोलकाकडून टायर जाळण्याचा प्रयत्न

## आक्रमक: सोयगाव तालुका शंभर टक्के बंद



सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात सकल मराठा समाजाच्या वतीने बुधवरी शासनाच्या विरोधात निदर्शने करून सोयगाव शहर व तालुका कडकडीत बंद शंभर टक्के यशस्वी करण्यात आला दरम्यान दुपारी एक वाजता संतप्त मराठा आंदोलकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात टायर जाळण्याचा प्रयत्न केला असता तातडीने पोलिसांनी हस्तक्षेप केल्या ने पुढील अनर्थ टळला दुपारी आंदोलक संतप्त झाल्याने सोयगावात तणाव निर्माण झाला परंतु पोलिसांनी हस्तक्षेप केल्या मुळे तणाव निवळला

सकाळी सात वाजेपासून सकल मराठा समाजाने कडकडीत बंद पुकारला तालुक्यासह ग्रामीण भागातही बंदचे पडसाद उमटले त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले दरम्यान शैक्षणिक महाविद्यालये शाळा आदींनीही बंद मध्ये सहभाग नोंदविला यावेळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात घोषणा बाजी करून शासनाविरुद्ध निदर्शने करून मराठा समाजाला पन्नास टक्क्यातून व हायदराबाद गॅझेट व सगे सोयरे अध्यादेश तातडीने काढुन आरक्षण देण्याची आग्रही मागणी आंदोलक नी केली होती दरम्यान आरक्षण साठी दहा दिवसापासून उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थ नार्थ सोयगाव बंद पुकारण्यात आला असल्याचे तालुका समन्वयक विजय काळे यांनी सांगितले यावेळी बुधवारी सायंकाळी साडेपाच वाजता सकल मराठा समाजाचा वतीने तालुका प्रशासनाला मागण्यांचे लेखी निवेदन सादर करण्यात आले निवेदनावर तालुका संमयनवयक विजय काळे,विजय गव्हाड,शिवाजी दौड,प्रदिप चौधरी,रवी काळे,ईश्वर गव्हाडे,कूष्णा पाटील,पंकज देशमुख,भगवान चौधरी, महेश मानकर,रामा गवळी,बडु कळवत्रे,विजय थोटे,सजंय जाधव,ऐकनाथ गौड,सतोश पवार,नितीन पाटील,आदींच्या स्वाक्षऱ्या होत्या.

# आजही मुसळधार पाऊस पडणार

## मुंबई आणि उपनगरातील शाळा-महाविद्यालयांना सुट्टी जाहीर

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुसळधार पावसामुळे मुंबई आणि उपनगरातील शाळांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकरांनी ही माहिती दिली. भारतीय हवामान विभागाने मुंबई महानगराला सकाळी ८.३० वाजेपर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

भारतीय हवामान विभागाने मुंबई महानगराला उद्या (दिनांक २६ सप्टेंबर २०२४) सकाळी ८.३० पर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला आहे. त्यामुळे शाळा-महाविद्यालयांना ही सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.भारतीय हवामान विभागाने मुंबई महानगराला उद्या (दिनांक २६ सप्टेंबर २०२४) सकाळी ८.३० पर्यंत अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) दिला आहे.या पार्श्वभूमीवर, विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना उद्या गुरूवार दिनांक २६ सप्टेंबर २०२४ रोजी सुटी जाहीर करण्यात आली आहे. मुंबईत बुधवारी दिवसभर पावसाची हजेरी आहे. संध्याकाळच्या वेळी पावसाचा जोर वाढल्याने त्याचा परिणाम मुंबई लोकलसेवेवर झाल्याचं दिसलं. मुसळधार पावसामुळे मध्य रेल्वे आणि पश्चिम रेल्वे विस्कळीत झाली होती. विक्रोळी, कांजूर, भांडुप या स्टेशन दरम्यान पाणी साचल्याने मध्य रेल्वेची वाहतूक ठप्प झाली होती. त्यामुळे घाटकोपर स्टेशनवर प्रवाशांची मोठी गर्दी झाल्याचं दिसून आलं. घाटकोपर रेल्वे स्थानक परिसरात पाणी साचल्याने स्टेशनवर प्रवाशांची प्रचंड गर्दी झाली होती. नंतर काही वेळानंतर लोकलसेवा पूर्ववत झाली.

### अंधेरी, गोरेगावमध्ये पावसाची बॅटिंग

मुंबईच्या पश्चिम उपनगरात मुसळधार पावसाने हजेरी लावली. अंधेरी, जोगेश्वरी, गोरेगाव, मालाड, कांदिवली, बोरिवली,दहिसर, विलेपार्ले, सांताक्रुझ, वांद्रे या सर्व परिसरात मुसळधार पाऊस पडला. मुंबईच्या सखल भागात मोठ्या प्रमाणात पावसाचं पाणी साचल्याचं दिसतंय.





# पान एक वरून

### अक्षय शिंदेचा दफनविधी

वडिलांचा फोन बंद असल्याची माहितीही वकिलांनी दिली. अक्षयचा मृतदेह दफन करण्यासाठी अडथळे निर्माण होत आहेत, त्यांना धमक्या दिल्या जात आहेत. तुम्ही कसा अंत्यविधी करतात ते आम्ही बघतो, असा दम दिला जात असल्याचे मी कोर्टाच्या निर्दशनास आणून दिल्याचे वकिल कटारनवरे यांनी म्हटलं आहे. तसेच, तिकडचे डीसीपी, लोकल ऑथोरिटीशी बोलतील आणि त्याच्या अंत्यविधीचा निर्णय ते घेतील, असे सरकारी वकील विनय रावकर यांनी न्यायालयात बोलताना म्हटल होते. मात्र, आता जी माहिती मिळत आहे, त्यानुसार अक्षयच्या वडील-आई यांना पोलिसांनी बोलवले आहे. पोलीस कॉन्स्टेबलशी बोललो तर, सिनिअर साहेबांनी बोलावलं आहे, चौकशीसाठी घेऊन चाललोय, असे सांगण्यात आल्याचे वकिलांनी म्हटले. एवढ्या रात्री एका महिलेला पोलीस घेऊन जात असतील, ज्यांचा मुलगा वारला आहे. पोलीस त्यांच्या घरी जाऊ शकत नाहीत का, असा सवाल वकिलांनी विचारला. तसेच, अक्षय शिंदे यांच्या वडिलांचा कॉल लागत नाही, बदलापूर पोलीस स्टेशनला घेऊन गेले असल्याची माहिती आहे. अक्षयच्या नातेवाईकांना त्याचा मृतदेह दफनच करायचा आहे, कोर्टामध्ये देखील त्यांनी तसं सांगितला आहे. सरकार पण म्हणाले आहे आम्ही लोकल ऑथॉरिटीशी बोलून स्टॅन्ड घेणार आहोत, संध्याकाळपर्यंत हे होणं अपेक्षित होते. मात्र, आत्तापर्यंत बॉडी का हवाली केली नाही, हे समजत नाही. जमीन त्यांनी द्यावी, बॉडी आम्ही दफन करू ही आमची विनंती सरकारने मान्य केली आहे. अंत्यविधी आतापर्यंत होणं अपेक्षित होतं. मात्र, त्यांनी आतापर्यंत शिंदे कुटुंबीयांना बॉडी देखील दिली नाही, ही जबाबदारी पोलिसांची आहे, असेही वकील अमित कटारनवरे यांनी एबीपी माझाशी बोलताना म्हटले.

### कमला हॅरिसां प्रचार

त्या परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त पावले उचलली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.गोळीबार घडल्यानंतर काही कर्मचाऱ्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. कार्यालयाच्या खिडक्यांमधून गोळ्या झाडल्या गेल्या. दरम्यान, या कार्यालयात अशी घटना दुसऱ्यांदा घडली असल्याचंही सांगितलं जात आहे. पोलिसांनी सांगितले की, समोरच्या खिडक्यांवर पेलेट गनने गोळीबार करण्यात आला. या घटनांनंतर अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. मात्र, पोलिसांकडून या घटनेचा तपास सुरु केला आहे.

### आमदारांच्या टक्केवारीमुळेच

दुकानांसह घरांमध्ये शिरले. डिव्हायडर नसल्याने अनेकदा गाड्या स्लिप होऊन अपघात होत आहेत. नागरिकांना होत असलेला त्रास आमदारांनी काम करताना केलेल्या हस्तक्षेपामुळे होत आहे. त्यांच्या काम करण्याच्या चुकीच्या पद्धतीची फळे बीडवासियांना भोगावी लागत आहेत, असेही डॉ.योगेश क्षीरसागर यांनी म्हटले आहे.

**नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी :** बीड शहरातील जनता गॅरेजपासून साई पॅलेसपर्यंत दुकानांमध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे अनेक व्यवसायिकांचे नुकसान झाले आहेत. या नुकसानीचे पंचनमाने करून प्रशासनाने आर्थिक मदत द्यावी अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे.

### जमियत उलमा संघटनेकडून

स्वच्छता अभियान, मतदान कार्ड बनवणे, शेतकरी बांधवांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशिल, महिलांच्या न्यायासाठी नेहमी आवाज उठवणे, गरिबांना मदत करणे,कोरोना काळातील सामाजिक दायित्व,आदी उपक्रम राबवित आलेले आहेत. मयुरीताई बाळासाहेब मस्के -खेडकर कुटुंब सर्व जाती धर्माच्या लोकांना मदत करण्यास आणि त्यांचे कार्य करण्यास सदैव तत्पर राहतात. त्यांचे कार्य पाहून त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी प्रशांत जगताप माजी महापौर पुणे, नजीर तांबोळी, काझी इद्रिस,हाजी गुलजार शेख,एड. अयुब इलाही बख्श,आसिफ खोकर आदी उपस्थित होते. यावेळी मयुरी बाळासाहेब मस्के -खेडकर यांनी मंचावरील सर्व प्रमुख पाहुण्यांना वंदन केले व कार्यक्रमात पुरस्कार दिल्याबद्दल आयोजकाचे आभार मानले,तसेच आपल्या उज्वल भविष्यासाठी सर्व लोकांकडून आशीर्वाद मागितले व हे प्रेम कायम ठेवण्याचे आवाहन मयुरीताई बाळासाहेब मस्के-खेडकर यांनी केले.कार्यक्रमाला हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते.

### काँग्रेसच्या डीएनएमध्येच

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हरियाणातील सोनीपतमध्ये बोलताना काँग्रेसकडून भ्रष्टाचार केला जात असल्याचा आरोप केला. आता जगभरातले लोक भारतात कंपनी उघडण्यासाठी येण्यास इच्छुक आहेत. त्यामुळे तुम्हीच विचार करा, हरियाणात कसं सरकार असायला हवं? हरियाणात उद्योगांना प्रोत्साहन देणारं भाजपा सरकार गरजेचं आहे. नोकऱ्या वाढवणारं भाजपा सरकार गरजेचं आहे. तुम्हालाही माहिती आहे, जिथे कुठे काँग्रेसचं सरकार आलं, जिथे त्यांना संधी मिळाली, जिथे जिथे काँग्रेसनं पाऊल ठेवलं, तिथे एक गोष्ट नक्की झाली. भ्रष्टाचार आणि घराणेशाही, असं मोदी यावेळी म्हणाले.भारताच्या सरकारी व्यवस्थेत भ्रष्टाचाराला जन्म देणारी, भ्रष्टाचाराचं पालन-पोषण करणारी, आपल्या देशात भ्रष्टाचाराची कुणी जन्मदात्री असेल तर ती काँग्रेस पार्टी आहे. काँग्रेसचा शाही परिवार देशाचा सर्वात भ्रष्ट परिवार आहे. जिथे हाय कमांडच भ्रष्टाचारी असतं, तिथे खालच्या लोकांना लुटीचा खुला परवाना मिळतोच, असंही मोदी म्हणाले.

# पान सहा वरून

### बेताल वक्तव्य सामाजिक

दुखावणारे वक्तव्य करत असेल तर त्याची कदापिही गया अथवा पाठराखण करु नये. कारण अशी माणसं समाजाला घातक आहेत. परिणामी राज्यात दंगलजन्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे समाजाचे वातावरण दूषित करणाऱ्या लोकांविरोधात तातडीने कारवाई करण्याचे निर्देश देण्यात यावेत.अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे निवेदनातून केली.

### होळ एमजीबी बँकेसमोर

वापरून शेतकऱ्यांना गप केले जात आहे असा होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेचा मनमानी कारभार सुरू असल्याने सर्वसामान्य माणूस त्रस्त झाले आहेत कारण महाराष्ट्र ग्रामीण बँके खाते दाराचे खाते होल्ड केल्यामुळे खाते दाराच्या खात्यात जमा झालेली रक्कम पीकविमा किसानचे रक्कम रिटायर कर्मचारी पगार, पीऐम किसान पागार रक्कम मिळत नसल्याने गणेश लाड २५/०९/२०२४ पासुन अमरण उपोषणाला बसले आहेत तरी गणेश लाड यांच्या अमरण उपोषणाची दखल घेऊन त्यांच्या मागण्या तात्काळ मान्य करण्यात याव्यात अशी मागणी गणेश लाड यांनी केली आहे.

### कार्यकर्त्यांचा मेळावा

घेऊन माजलगाव मतदार संघातील सर्व कार्यकर्त्यांना निमंत्रित केले असुन याच मेळाव्यात कार्यकर्त्यांच्या जन रेट्या मुळे मी माझी भूमिका स्पष्ट करणार आहे. असे मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी म्हटले आहे.

### वडवणीत दोन दिवसीय

आयोजन करण्यात येत आहे. केंद्रीय संचार ब्युरोच्या पोषण माह अभियान मल्टीमीडिया चित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून नागरिकांना पोषणसंदर्भातील माहिती देण्यात आली. तसेच प्रदर्शनस्थळी लावण्यात आलेल्या आरोग्य शिबीरामध्ये नागरिकांची मधुमेह, रक्तदाब, हिमोग्लोबिन तसेच गरोदर महिलांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तर महिला व बालकल्याण विभागातर्फे पोषण आहारासंदर्भातील प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महिला बचत गटांना निधीचे वाटप करण्यात आले.

### शेकटामध्ये ट्रेनि

सुरूच होती. संप असतानाही शाळा सुरू कशी असा प्रश्न ग्रामस्थांना निर्माण झाला. शेकटा शाळेत जवळपास २७५ विद्यार्थी संख्या असून शाळेत ६ नियमित शिक्षक आहेत. तसेच गावातीलच काही शिक्षणप्रेमी युवकांची ट्रेनि शिक्षक म्हणून निवड करण्यात आल्याने त्यांनी शाळा नियमित सुरूच ठेवली. यामध्यें प्रा. तुकाराम महानोर यांचा विद्यार्थ्यांना शिकवणीचा मोठा अनुभव असल्याने दिवसभर शाळा व्यवस्थित भरवली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळा दिवभर भरवून बंदचे विद्यार्थ्यांवर दुष्परिणाम जाणवले नाही. त्याचबरोबर सचिन गडदे व राजेंद्र शेंबडे यांनीही त्यांना मोलाचे सहकार्य करत शाळा भरवण्यात मोठे योगदान दिले.

### प्रलंबित कामे तातडीने

विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. यावेळी नागरिकांच्या समोरच अधिकार्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. यासोबतच बीड मतदारसंघ क्षेत्रात शिरूर-कासार तालुक्यातील फुलसांगवी व इतर गावातील ग्रामस्थांचे काही दिवसांपूर्वी जलसंधारण विभागाशी संबंधित कामांच्या अनुषंगाने आंदोलन सुरू होते. या आंदोलनातील मागण्या मार्गी लावण्यासाठी आ.क्षीरसागर यांनी जिल्हा जलसंधारण अधिकारी व जायकवाडी पाटबंधारे प्रकल्प कार्यकारी अभियंता तसेच पाटबंधारे विभागाचे अधिकारी यांना सूचना दिल्या. या बैठकीसाठी संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी व संबंधित नागरिक, शेतकरी बांधव उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# मुसळधार पावसाचा पिकांना फटका

**अस्मानी** शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात बुधवारी सकाळी सात ते दहा वाजेपर्यंत तीन तास संततधार पाऊस झाला त्यामुळे पिकांना नुकसानीचा फटका बसला आहे दरम्यान सप्टेंबर महिन्यात च दोनदा झालेल्या मुसळधार पावसाने खरिपाच्या पिकांची वाट लागली आहे त्यामुळे सोयगावला शेतकरी हवालदिल झाले आहे मात्र महसूल व कृषीच्या संयुक्त पथकांनी पिकांच्या नुकसानी कडे शासनाच्या निकषांवर दुर्लक्ष केले आहे

सोयगाव तालुक्यात बुधवारी तीन तास संततधार पावसाने कपाशी व मक्याच्या पिकांना फटका बसला आहे मका पिके कापणीवर आलेली असतांना पावसात भिजून खराब झाली आहे कपाशीच्या पिकांमध्ये पाणी साचून कापसाच्या कैऱ्या काळवंडून गेल्या तर फुटलेला कापूस गळून पडला आहे बनोटी भागात कापसाच्या वाती झालेल्या आहे त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहे दरम्यान सप्टेंबर च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील ७२



गावांमध्ये १५,७५७ हेक्टरवर पिके ३३ टक्क्यांच्या अधिक बाधित झालेली आहे त्यामुळे या ३३ टक्क्यांच्यावर नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे अद्यापही हाती घेतलेली नसतांना बुधवारी अचानक झालेल्या तीन तासांच्या संततधार पावसाने पुन्हा नुकसान झाले आहे तिडका बोरमाळ तांडा तितुर हनुमंत खेडा वडगाव शिंदोल या गावात झालेल्या वादळी वाऱ्याने व मुसळधार पावसामुळे कापशी पिके आडवी झाली आहे त्यामुळे या सहा गावांना मोठे नुकसान झाले आहे.

सोयगाव सह तालुक्यात मंगळवारी रात्री पासून अचानक नैसर्गिक आपत्ती निर्माण झालेली असतांना महसूल चा एकही तलाठी सज्जा वर उपस्थित नव्हता त्यामुळे तालुका वाऱ्यावर होता तलाठी गायब असल्याने नुकसानीची माहिती शेतकऱ्यांना महसूल पर्यंत पोहचविण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या .

बनोटी पट्ट्यातील ३९ गावांना बुधवारी सायंकाळी साडेसहा पासून विजांच्या कडकडाटात सह ढगफुटी सदृश पावसाने धुमाकूळ घातला होता त्यामुळे या भागात बुधवारी रात्री उशिरापर्यंत पावसाची तुफान बॅटिंग सुरू होती महसूल यंत्रणा बनोटी मंडळात ठप्प झाली होती.

# विद्यमान आमदारांनी काय दीवे लावले?

**अंजली घाडगे:** केजमध्ये गाठीभेटीभर अधिक भर

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी



पवार गटाच्या डॉ. अंजलीताई घाडगे यांना मुंबई येथे पक्ष प्रवेश केल्या पासुन त्यांनी केज मतदार संघातील गावात जनतेच्या गाठी भेटी सुरु केल्याने त्यांना मतदार ही चांगला प्रतिसाद देत असल्याने केज मतदार संघात अंजली घाडगे यांचा जनसंपर्क वाढल्याने विरोधकांची धाकधुक वाढली आहे तसेच विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांच्या सारखे कामे आडवा माणसं जिरवा हा उपक्रम मतदार संघात राबणार नाही.

मतदार संघाचा औदयोगिक शैक्षणिक आर्थिक सहकार क्षेत्रात वेगाने विकास होऊ शकतो हा विश्वास नागरिकांना आहे तसच सामाजिक सलोखा दृढ होईल. डॉ अंजली घाडगे यांच्या मूळे शासकीय पातळीवर कामे होण्यास अडचणी निर्माण होणार नाहीत आणि कामे आडवा माणसे जिरवा हा उपक्रम मतदार संघात राबणार सामान्य जनतेला एक चांगला लोकप्रतिनिधी पाहता येईल असा विश्वास लोकांना वाटतो आहे.

डॉ अंजली घाडगे या आपल्या वडिलांच्या कठीण प्रसंगच्या बाबतीत हळव्या असल्यामुळे उपेक्षित सर्व सर्व समाजासोबत त्यांचा शासकीय प्रशासकीय अनुभव कामाला येईल व सामान्य जनतेला एक चांगला लोकप्रतिनिधी पाहता येईल असा विश्वास लोकांना वाटतो आहे तसेच विद्यमान यांनी काय दीवे लावले आहेत असे सुध्दा अंजलीताई घाडगे यांनी म्हटले आहे त्यामुळे आमदारा नमीता मुंदडा यांचा भ्रष्टाचारी पडदा पाडण्यासाठी डॉ अंजलीताई घाडगे योग्य उमेदवार आहेत असे चर्चा सत्र नागरिकांन मध्ये सुरू झाले आहे.




**सिरसाळा :** धनगर समाज बांधवांनी एसटी आरक्षण प्रश्नी रास्ता रोको आंदोलन केले.दरम्यान उपस्थित मराठा समाज बांधव व पाठिंबा स्विकारतांना.

# विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण व्हावा

**डॉ.राहुल खडके:** आदित्य पॉलीटेक्निकमध्ये मेळावा

बीड/पुण्यभूमीप्रतिनिधी

संस्थेतील प्राध्यापकांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद निर्माण होणे गरजेचे आहे. त्यांना शैक्षणिक वातावरणाशी जुळवून घेता यावे व तंत्रनिकेतनाचे शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल या साठीच संस्था सदैव प्रयत्नशील असते. संस्था तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आदित्य शिक्षण संस्थेत नेहमीच विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होतो. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राहुल खडके यांनी केले.

शहरातील आदियत्य शिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा याकरता आदित्य शिक्षण



संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाष सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. अदिती सारडा,संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य पॉलीटेक्निक मध्ये प्रथम वर्षीय विद्यार्थ्यांसाठी कार्यपरिचय उपक्रम व विद्यार्थी ,पालक स्वागत मेळावा मेळावा अयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ.राहुल खडके बोलत होते.कार्यपरिचय उपक्रमात एआयसीटीई, तंत्रशिक्षण संचालनालय, एमएसबीटीई, तंत्रनिकेतन संस्था, आदित्य एज्युकेशन ग्रुप या संस्थेतील सोयीसुविधा, अभियांत्रिकीच्या विविध शाखा, त्यांचे परस्परांशी असलेले संबंध, व्यक्तिमत्त्व विकास, संगणकीय सुविधा, त्यांचे महत्त्व, विविध अभ्यासक्रम, पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरच्या करिअर संधी, अशा अनेक विषयांवर प्रथम वर्षीय प्राध्यापक प्राध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल खडके उपस्थित होते. विभागप्रमुख प्रा. दुधाळ, प्रा. जाधव डी. एम. यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रथम वर्ष कोर्स कॉर्डिनेटर प्रा. तेजस्विनी आरडे , प्रा. गजानन खालापुरीकर , प्रा. आकांक्षा सवासे, प्रा.अशोक मुंडे, प्रा.मयुरी गोंटे ,प्रा. दुर्गे यांनी मेहनत घेतली.

# कामगारांच्या जीवनाला स्थैर्य मिळवून दिले

**रमेश पोकळे:** स्व.अण्णासाहेब पाटील यांची जयंती साजरी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

समाजातील सर्व जाती धर्मातील कष्टकरी, मजूर, माथाडी कामगारांना एकत्रित करून त्यांच्या न्याय हक्कासाठी स्व. अण्णासाहेब पाटील यांनी चळवळ उभी केली. या चळवळीच्या माध्यमातून माथाडी कामगारांना सेवा, आरोग्य, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी तत्कालीन सरकारला माथाडी कायदा करायला लावून माथाडी कामगाराच्या जीवनाला स्थैर्य मिळवून देण्याचे महान कार्य स्व. अण्णासाहेब पाटील यांनी केले. असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले आहे.

येथील वसंतराव काळे कॉलेज ऑफ जर्नालिझम अँड कम्प्युटर सायन्स आणि संभाजी राजे कॉलेज ऑफ लायब्ररी अँड मॅनेजमेंट सायन्स बीड यांच्या संयुक्त विद्यमाने माथाडी कामगार नेते स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून रमेश भाऊ पोकळे हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून




प्रा. बापूसाहेब शिंदे, तेजस शिंदे, हनुमान मुळीक, राहुल वायकर, संस्था सचिव गणेश पोकळे व प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना पोकळे म्हणाले की, समाजातील आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या सर्व जाती-धर्मातील विद्यार्थ्यांना शिक्षणात सवलती मिळाव्यात. तसेच मराठा समाजाला आरक्षण मिळावे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव मिळावा. माथाडी कामगारांना सेवा, आरोग्य सुविधा,अशा अन्य मागण्या घेऊन मुंबईमध्ये भव्य मोर्चा स्व. अण्णासाहेब पाटील यांनी काढला. परंतु शेतकऱ्यांच्या, विद्यार्थ्यांच्या, माथाडी कामगारांच्या विविध मागण्यांना तत्कालीन असंवेदनशील सरकार सकारात्मक प्रतिसाद देत नसल्यामुळे समाजाच्या विविध मागण्यासाठी स्व. अण्णासाहेब पाटील यांनी स्वतःचे बलिदान दिले.

समाजातील तळागळातील लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी अहोरात्र कार्य केले. या त्यांच्या कार्याला प्रेरणा म्हणून त्यांच्या नावाने आपण संस्था स्थापन केली. या संस्थेचे महाविद्यालय सुरू करून आज बीड शहरातील आणि ग्रामीण भागातील कष्टकरी,कामगार, गोरगरीब शेतकर्यांचे हजारो विद्यार्थी या महाविद्यालयाच्या माध्यमातून शिक्षण घेत आहेत. स्व. अण्णासाहेब पाटील यांना अभिप्रेत असणारे कार्य आमची संस्था नेहमी करत राहिल असेही पोकळे म्हणाले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. बापूसाहेब शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी केले. यावेळी बोलताना त्यांनी स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि शेवटी आभार प्रा. शिवशंकर पटवारी यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा.सुहास गाढवे, प्रा. राजश्री महाजन, प्रा. शेख, महेश नेवडे, दीपक जाधव, इम्रान पठाण, सचिन चौरे, रसिका पाटील, प्रिती खडके,सौ. संध्या खोसे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कांदा आयातीवर शंभर टक्के बंदी घाला

**वैभव शिंदे :** केंद्र सरकारच्या धोरणात शेतकऱ्यांचे मरण

नेकनूर/पुण्यभूमी प्रतिनिधी



कांदा आयात-निर्यातीचे केंद्राच धोरण शेतकर्यांचे मरण या शब्दालाच अनुसरून सुरू आहे.केंद्र सरकारकडून कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात ठेवण्यासाठी परदेशातून कांदा आयात करण्यासाठी परवानगी दिल्याने अफगणिस्तानमधून पंजाब राज्यातील अमृतसर,जालंदर या शहरांमध्ये ११ मालट्रकमधून दाखल झाला आहे ,तर कांद्याने भरलेल्या पंचेचाळीस ते पन्नास ट्रक बॉर्डरवर उभ्या असल्याने येत्या दोन-तीन दिवसांमध्ये भारतात मोठ्या प्रमाणात अफगाणिस्तानचा कांदा दाखल होणार असल्यामुळे आता महाराष्ट्रसह देशभरातील कांदा बाजारभाव पडण्याची शक्यता आहे. कांद्याचे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्राच्या वाणिज्य मंत्रालयाच्या ग्राहक संरक्षण विभागाकडून किंमत स्थिरीकरण निधी अंतर्गत पाच लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्यात आला होता. दिल्ली,मुंबई,चेन्नई,कलकत्ता,भुवनेश्वर या संदेशातील मेगा मेट्रो सिटी मध्ये तीस ते पस्तीस रुपये किलो प्रमाणे केंद्रे सुरू करत विक्री सुरू केली,मात्र कांद्याचे दर नियंत्रणात येत नसल्यामुळे आता केंद्र सरकारने परदेशातून कांदा आयातीला परवानगी दिली आहे.हा आयात केलेला कांदा महाराष्ट्रापर्यंत पोहोचल्यावर कांद्याचे दर १० ते २० रुपयांनी कमी होण्याची शक्यता आहे. देशांतर्गत बाजारपेठेत मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्यामुळे कांद्याचे दर किरकोळ बाजारात ६० ते ७० रुपये किलो आणि घाऊक बाजारात क्विंटलमागे ४५०० ते ४७०० रुपयांवर पोहोचले आहेत. वाढणारे भाव नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने अफगाणिस्तानातून कांदा आयात सुरु केली आहे.अनेक महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर शेतकऱ्यांच्या कांद्याला कुठेतरी आता चांगला दर मिळत असताना अद्यापही केंद्र सरकार कांदा निर्यातीवर २० टक्के शुल्क घेत असतानाही अफगाणिस्तानमधून कांदा आयात करण्यास परवानगी दिली.त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होणार आहे.

**धोरण** २९ हजार २८२ हेक्टरवर ई पीक पाहणी

# मुदत वाढीचा संभ्रम कायम!

सोयगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सोयगाव सह तालुक्यात (दि.१५) आगस्ट ते (दि.२३) सप्टेंबर या कालावधीत तब्बल २२ हजार २२८ शेतकऱ्यांनी २९ हजार २८२ हेक्टरवर ई पीक पाहणी द्वारे सातबाऱ्यावर पिकांची नोंद घेतलेली आहे अशी माहिती मंगळवारी महसूल विभागाने दिली

तालुक्यात ३२ हजार शेतकऱ्यांची महसूल दरबारी नोंद असून चाळीस हजार ५६९ हेक्टरवर खरिपाच्या पेरण्या झालेल्या आहे त्यापैकी २९ हजार २८२ हेक्टरवर इ पीक पाहणी करण्यात आली असून,या क्षेत्रावरील पिकांची आता शेतीच्या उताऱ्या वर पिकपेरा नोंदी झालेल्या आहेत दरम्यान यंदा शासनाने कापूस आणि सोयाबीन पिकांना अर्थसाह्य अनुदान पोटी हेक्टरी पाच हजार रु मदत जाहीर केली परंतु




यासाठी ई पीक पाहणी ची अट अनिवार्य केली होती त्यामुळे यंदाच्या हंगामात २२ हजार २२८ शेतकऱ्यांनी ही नोंद करून शेती उताऱ्यावर पिकपेरा नोंदवून घेतला आहे दरम्यान या ई पीक पाहणी साठी (दि.२३) सप्टेंबर पर्यंत मुदत होती दरम्यान मंगळवारी (दि.२४)सायंकाळी सहा वाजेपर्यंतही मुदत वाढीचे आदेश महसूल विभागाला प्राप्त झाले नव्हते त्यामुळे शेतकऱ्यांचा संभ्रम वाढला होता मंगळवारी सायंकाळी सहा वाजेपर्यंत महसूल आणि कृषी विभागाशी संपर्क केला असता,अद्यापही मुदत वाढीच्या कोणत्याही सूचना प्राप्त नसल्याचे तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी सांगितले.

### दहा हजार ८८२ शेतकरी ई पीक पाहणीपासून वंचित

सोयगाव तालुक्यात ई पीक पाहणी पासुन अद्यापही दहा हजार ७१८ हेक्टरवरील पिके शेतीच्या उताऱ्यावर नोंदी अभावी राहिले असून शासनाने अद्यापही ई पीक पाहणीची मुदत वाढ घोषित केलेली नाही दरम्यान मंगळवारी सायंकाळी सहा वाजेपासून ई पीक पाहणीचे ॲप्स बंद झाले आहे त्यामुळे संभ्रम वाढला आहे.

# हिंदुराष्ट्र सेनेची सोपविली धुरा

**निवड:** परळी तालुका प्रमुखपदी विजय बडे

सिरसाळा/पुण्यभूमी प्रतिनिधी

सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या देव.देश.धर्म धर्मसंस्कृती जपून गोरक्षण या पवित्र कार्यात सहभाग घेऊन धर्मनिष्ठ युवकांचे संघटन करून धर्म रक्षणासाठी रस्त्यावर उतरून काम करणारा युवक म्हणून विजय बडे यांच्या कडे पाहिले जाते हिंदुराष्ट्र सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष हिंदुतेजसूर्य धनंजय भाई देसाई यांच्या आशीर्वादाने त्यांची हिंदुराष्ट्र सेनेच्या परळी वैजनाथ तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली आहे येणाऱ्या काळात प्रत्येक गावात हिंदुराष्ट्र सेनेची शाखा व घर तिथे हिंदुराष्ट्र वीर तयार करण्याची



जबाबदारी घेतली आहे धर्म संस्कृती दूर गेलेला आजचा युवक लव जिहाद मध्ये . धर्मांतर मध्ये अडकणारे समाज या सर्व प्रश्नांवर काम आणि मुलीच्या रक्षणासाठी हिंदुराष्ट्र विरांच संघटन करून गुरुवर्य धनंजय भाई देसाई यांचे विचार प्रत्येकाच्या घरात पर्यंत पोहचऊ निवडी बद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे




## ▌सर्वोच्च न्यायालयाने पंजाब सरकारला फटकारले
## ▌उच्च न्यायालयाचा आदेश कायम

# एनआरआय कोट्यातील सुनावणीस नकार

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** एमबीबीएसच्या जागांमध्ये एनआरआय कोट्याच्या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने पंजाब सरकारला फटकारले आहे. सर्वोच्च न्यायालयाने एमबीबीएसच्या जागांमध्ये एनआरआय कोट्यासंदर्भातील याचिकेवर सुनावणी करण्यास नकार दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला आहे.

पंजाब सरकारने एनआरआय कोट्यातील प्रवेशामध्ये जवळचे नातेवाईक आणि आश्रितांनाही समाविष्ट केले होते. जी उच्च न्यायालयाने रद्द केली. आज सर्वोच्च न्यायालयाने पंजाब सरकारलाही फैलावर घेतले. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने याला पैसे उकळण्याचा मार्ग म्हटले. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, गुणवंत विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येत नाही आणि लोकांना त्यांच्या एनआरआय मामा, मामा आणि मामाच्या नावाने प्रवेश दिला जात आहे ही संपूर्ण फसवणूक आहे. गेल्या महिन्यात पंजाब सरकारने एनआरआय कोट्यात हा बदल केला होता'असे म्हटले आहे.

### एनआरआय कोट्याच्या नियमात बदल

बाबा फरीद युनिव्हर्सिटी अँड हेल्थ सायन्सेसने चंदीगड आणि पंजाब राज्याच्या वतीने वैद्यकीय यूजी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रॉस्पेक्टस जारी केले होते. यामध्ये यूजी कोट्याची शेवटची तारीख १६ ऑगस्ट आणि पंजाब राज्यासाठी १५ ऑगस्ट अशी नमूद करण्यात आली होती. अर्ज भरल्यानंतर राज्य सरकारने २० ऑगस्ट रोजी प्रवेश प्रक्रियेत बदल केल्याचे याचिकेत म्हटले आहे. याशिवाय एनआरआय कोट्याच्या नियमांमध्येही बदल करण्यात आले आहेत. एनआरआय कोट्यातील जागा रिक्त असताना एनआरआय कोट्यातून इतर उमेदवारांना एमबीबीएसमध्ये प्रवेश देण्यात आल्याचा आरोप आहे.

# बदलापूर प्रकरणावर प्रकाश आंबेडकरांचा सरकारवर हल्ला

देशोन्नती वृत्तसंकलन

**पुणे :** बदलापूरमधील खासगी शाळेतील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. या खळबळजनक घटनेनंतर विरोधकांनी पोलीस आणि राज्य सरकारवर प्रश्न उपस्थित केलेत. तर दुसरीकडे अशातच वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीदेखील सरकारवर हल्लाबोल केला आहे.

बदलापूरमध्ये त्या लहान मुलींसोबत घटना घडली, तेव्हा अगोदर आरोपींना शोधण्यात शिंदे फडणवीस सरकार कमी पडले. मदतनीस कसे मोकळे सुटतील याची काळजी घेतली गेली. आरोपीला दुसऱ्या केसमध्ये घेऊन जात असताना त्याने रिव्हॉल्व्हर हिसकून घेतले फायरींग केले त्यात त्याचा मृत्यू झाला. ज्या पोलीस अधिकाऱ्याला गोळी लागली आहे, त्याच्यासोबत आमची सहानुभूती आहे.



मात्र, शासनाने त्यांचा मेडिकल रिपोर्ट सादर करावा, त्याला कुठे गोळी लागली त्याची संपूर्ण माहिती द्यावी, त्यामुळे जी आता चर्चा सुरू आहे ती थांबेल, आता ज्या केसमध्ये आरोपीला घेऊन जात होते, त्याच्या बायकोच्या तक्रारीबाबत त्याला घेऊन जात होते, नेमकं कशाच्या शोधासाठी त्याला घेऊन जात होते त्याचा खुलासा करावा, असेही आंबेडकरांनी म्हटले. कायद्याच्या योग्य पद्धतीशी जुळवून घेतल्याशिवाय न्याय अपूर्ण आहे.

# इझू बेटावर ५.६ रिश्टरचा भूकंप; त्सुनामीचा इशारा

देशोन्नती वृत्तसंकलन

**टोक्यो :** जपानमधील दुर्गम इझू बेटाजवळ मंगळवारी (दि. २४ सप्टेंबर) ५.६ रिश्टर तीव्रतेचा भूकंप झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू बेटाच्या दक्षिणेस सुमारे १८० किलोमीटर (१११ मैल) अंतरावर होता, अशी माहिती युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हेने (USGS) दिली. यानंतर जपानच्या हवामान संस्थेने (जेएमए) सुनामीचा इशारा जारी केला आहे.

जपान हवामान संस्थेने दिलेल्या त्सुनामी इशानुसार,




मंगळवारी सकाळी ८. ३० ते ९ वाजेच्या दरम्यान जपानमधील इझू बेट आणि ओगासावारा बेटांवर १ ते ३ मीटर उंच लाटा उसळतील असेही हवामान विभागाने स्पष्ट केल्याचे वृत्त टाईम्स ऑफ इंडियाने दिले आहे. जपान हे पॅसिफिक महासागरामधील रिंग ऑफ फायर म्हणून ओळखले जाते.



**पाटणा :** बिहारमधील गंगा नदीच्या पाण्याच्या पातळीत वाढ झाल्यामुळे बक्सर, भोजपूर, सारण, वैशाली, पाटणा, समस्तीपूर, बेगुसराय, लखीसराय, मुंगेर, खगरिया, भागलपूर आणि कटिहारमधील बहुतांश भाग पुरामुळे प्रभावित झाला आहे.


# प्रसादाच्या बॉक्समध्ये सापडले गुटख्याचे पाकिट?

देशोन्नती वृत्तसंकलन

**तिरूपती :** तिरुपती मंदिराच्या प्रसादावरून वाद अजूनही कायम आहे. जेव्हापासून मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी प्रसादाच्या गुणवत्तेशी छेडछाड करून तुपात प्राण्यांची चरबी मिसळली जात असल्याचा दावा केला होता. तर आता आणखी एक बातमी समोर आली आहे. तिरुपती प्रसादाचा डबा उघडला असता त्यात गुटख्याचे पाकिट दिसल्याचा दावा एका भक्ताने केला आहे.

तेलुगू वेबसाइट समयच्या रिपोर्टनुसार, १९ सप्टेंबर रोजी तेलंगणातील खम्मम जिल्ह्यातील डोंटू पद्मावती नावाची महिला तिरुपती मंदिरात गेली होती. तेथे दर्शन घेऊन प्रसाद घेतला. आता

**मंदिरात गेलेल्या भक्ताचा मोठा दावा**



प्रसाद बॉक्स उघडला असता त्यात गुटख्याचे पाकिट दिसल्याचा दावा करण्यात आला आहे. वर त्या प्रसादातही गुटख्याचे काही अंश सापडले. आता त्याच प्रसादाचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, लोक वेगवेगळ्या पद्धतीने कमेंट करत आहेत. प्रसादाच्या दर्जाबाबत आधीच वाद सुरू असल्याने हा वाद अधिकच वाढला आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी एनडीएच्या बैठकीत सांगितले होते की उपलब्ध तिरुमला लाडू निकृष्ट दर्जाचे आहेत, ते तुपाऐवजी प्राण्यांची चरबी वापरत आहेत. जेव्हापासून टीडीपीचे सरकार आले आहे, तेव्हापासून संपूर्ण प्रक्रिया स्वच्छ करण्यात आली आहे आणि लाडूंचा दर्जा सुधारला आहे. मंदिर मंडळाने लाडूंमध्ये वापरण्यात येणारे तूप चाचणी करून घेतले होते. त्यांच्या वतीने हे तूप गुजरातस्थित पशुधन प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. तुपाचे नमुने प्रयोगशाळेत पाठवण्यात आले तेव्हा ९ जुलै ही तारीख होती. त्या तपासणीचा अहवाल १६ जुलै रोजी पुन्हा आला ज्यात तुपाचा नमुना चांगला निघाला नसल्याचे सांगण्यात आले.

# बुल्गारियाचा ब्राइड मार्केटमध्ये वधूचा बाजार

## आईवडीलच लावतात आपल्या मुलीची बोली

देशोन्नती वृत्तसंकलन

**बुल्गारिया :** बुल्गारियाचा ब्राइड मार्केट जगभरात प्रसिद्ध आहे. येथे लोक फिरून स्वतःच्या पसंतीच्या पत्नीचा शोध घेतात. बुल्गारियात स्तारा जागोर नावाचे एक ठिकाण आहे, जेथे वधूंची विक्री होते. या ठिकाणाला जिप्सी ब्राइड मार्केट या नावानेही ओळखले जाते. या ठिकाणी पुरुष स्वतःच्या परिवारासोबत येतात आणि स्वतःसाठी पसंतीची मुलगी निवडतात. तेथे मुली मेकअप करून चमकणारे दागिने घालून येत असतात. पसंत पडलेल्या मुलीसोबत विवाह करण्यासाठी पुरुषाला तिच्या आईवडिलांसोबत मोलभाव करावा लागतो.




# गृहमंत्री अमित शाहांच्या विधानाने बांगलादेश संतप्त

वृत्तसंस्था

**ढाका :** गृहमंत्री अमित शाह यांनी बांगलादेशी घुसखोरांबाबत केलेल्या वक्तव्यामुळे मोहम्मद युनूस यांचे अंतरिम सरकार संतप्त झाले आहे. बांगलादेशने भारत सरकारला बांगलादेशातील लोकांबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी टाळण्याचा सल्ला दिला आहे. एका निवडणूक रॅलीदरम्यान अमित शाह यांनी बांगलादेशी घुसखोरांना झारखंडमधून बाहेर काढण्याबाबत बोलले होते. ज्याला मुहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारने तीव्र विरोध दर्शवला आहे.

बांगलादेशच्या परराष्ट्र मंत्रालयाने सोमवारी ढाका येथील भारतीय उच्चायुक्तांना यासंबंधीचे निषेध पत्र सादर केले आहे. बांगलादेशने पत्राद्वारे म्हटले आहे की, शेजारी देशाच्या जबाबदार लोकांकडून येणारी अशी विधाने दोन्ही मित्र देशांमधील परस्पर समंजसपणा आणि आदराची भावना कमकुवत करतात. खरे तर, शुक्रवारी गृहमंत्री अमित शाह यांनी झामुमोच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकारवर आरोप केले होते.



**बांगलादेश सरकार संतप्त**

मतपेढीच्या राजकारणासाठी हे लोक बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देत असल्याचे त्यांनी म्हटले होते. त्यांना रोखले नाही तर येत्या २५-३० वर्षांत बांगलादेशी घुसखोर बहुसंख्य होतील, असा इशारा गृहमंत्र्यांनी दिला होता. बोकारो येथे आयोजित निवडणूक रॅलीदरम्यान गृहमंत्री म्हणाले की, 'झारखंडमध्ये बांगलादेशी घुसखोरांना जागा नाही. ते आमच्या मुलींची लग्न लावून आमची जमीन बळकावत आहेत. यासोबतच ते समृद्ध आदिवासी संस्कृती नष्ट करत आहेत. गृहमंत्री म्हणाले की, 'जर असेच चालू राहिले तर येणाऱ्या काळात हे लोक बहुसंख्य होतील. काँग्रेस आणि हेमंत सोरेन त्यांना रोखणार नाहीत, कारण हे लोक व्होट बँकेचे राजकारण करतात.

# लाखांचे बक्षीस असलेला गुन्हेगाराचा मृत्यू

## दोन आरपीएफ कॉन्स्टेबलच्या हत्येप्रकरणी वाँटेड

देशोन्नती वृत्तसंकलन

**गाझीपूर :** ऑगस्ट महिन्यात उत्तर प्रदेशातील गाझीपूर येथे दोन आरपीएफ कॉन्स्टेबल जावेद खान आणि प्रमोद कुमार यांच्या हत्येप्रकरणी वाँटेड असलेला गुन्हेगार उत्तर प्रदेश एसटीएफच्या नोएडा युनिट आणि गाझीपूर पोलिसांच्या टिमसोबत झालेल्या पोलीस चकमकीत गंभीर जखमी झाला आहे. या गुन्हेगारास उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले, तेथे त्याचा मृत्यू झाला.

उत्तर प्रदेश पोलिसांच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने याबात सविस्तर माहिती देताना सांगितले की, जखमी गुन्हेगाराला उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले, तेथे त्याचा मृत्यू



झाला. मोहम्मद जाहिद उर्फ सोनू, रहिवासी पाटणा (बिहार) असे त्याचे नाव असून त्याच्यावर एक लाख रुपयांचे रोख बक्षीस आहे. अतिरिक्त पोलीस महासंचालक, कायदा आणि सुव्यवस्था आणि एसटीएफ अमिताभ यश यांनी सांगितले की, '१९-२० ऑगस्टच्या रात्री दोन आरपीएफ कॉन्स्टेबल जावेद खान आणि प्रमोद ट्रेन क्रमांक १५६३१ बारमेर गुवाहाटी एक्स्प्रेसमध्ये अवैध दारूची तस्करी थांबवण्याचा प्रयत्न करत होते. दारू तस्करांनी दोन्ही हवालदारांना बेदम मारहाण केली आणि चालत्या ट्रेनमधून फेकून दिले, परिणामी दोन्ही हवालदारांचा मृत्यू झाला. एडीजी कायदा आणि सुव्यवस्था आणि एसटीएफ यांनी सांगितले की मोहम्मद जाहिद या प्रकरणात हवा होता आणि त्याच्यावर एक लाख रुपयांचे बक्षीस घोषित करण्यात आले होते.

# बियरच्या स्वीमिंग पूलची क्रेझ

## प्रत्येक जण घेतो पोहण्याचा आनंद

वृत्तसंस्था

**ऑस्ट्रिया :** स्वीमिंग पूलची क्रेझ सर्वाधिक असते. उन्हाळयात हॉटेलपासून रिजॉर्टपर्यंत स्वीमिंग पूलमध्ये पोहण्यासाठी चढाओढ दिसून येते. पाण्यासोबत बियरच्या स्वीमिंग पूलचाही लोक पोहण्यासाठी वापर करत आहेत. असाच एक बियरचा स्वीमिंग पूल तयार करण्यात आला आहे. लोक हॉटेल, रिजॉर्ट समवेत अन्य ठिकाणी जात तेथील स्वीमिंग पूलमध्ये पोहत असतात.

ऑस्ट्रियातील या स्वीमिंग पूलमध्ये पाणी नव्हे तर बियर असते. या स्वीमिंग पूलमध्ये लोक मोठ्या आवडीने येतात आणि पोहण्याचा आनंद घेतात. ऑस्ट्रेलियाच्या टेरेंट्जमध्ये जगातील पहिला बियर स्वीमिंग पूल सुरू झाला आहे. टेरेट्जच्या शलोस स्टारर्कनबर्गर ब्रेवरीमध्ये असे ७ स्वीमिंग पूल असून ते १३ फूट लांब आहेत.

## पंतप्रधान मोदी यांची अनेक नेत्यांशी भेट

**न्यूयॉर्क :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेत अनेक देशांच्या नेत्यांशी चर्चा केली आहे. या नेत्यांमध्ये नेपाळचे नेते के. पी. शर्मा ओली, पॅलेस्टाईनचे नेते मोहम्मद अब्बास आणि कुवैतचे राजपुत्र शेख सबाह खालेद अल-हमद अल-सबाह अल-सबाह यांचा समावेश होता.

# न्यायालयाच्या आदेशाशिवाय घेतलेला प्रत्येक जीव फक्त खून

## प्रियंका गांधी यांची पोस्ट व्हायरल

वृत्तसंस्था

**नवी दिल्लीः** बदलापूरमधील खासगी शाळेतील लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे याचा पोलिसांसोबत झालेल्या चकमकीत मृत्यू झाला. या खळबळजनक घटनेनंतर विरोधकांनी पोलीस आणि राज्य सरकारवर प्रश्न उपस्थित केलेत. तर दुसरीकडे काँग्रेसच्या नेत्या प्रियंका गांधी यांच्या एका पोस्टची जोरदार चर्चा होताना दिसून येत आहे. अक्षय शिंदेच्या मृत्यूनंतर विरोधकांनी अनेक प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केलीय. त्यातच आता प्रियंका गांधी यांची एक पोस्ट व्हायरल होत आहे. ज्यामध्ये त्यांनी १३ हजार एन्काऊंटरवर भाष्य केले आहे. काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आपल्या पोस्टमध्ये, 'खून, हिंसाचार, रक्तपात आणि एखाद्याचा जीव हिरवण्याचा राजकीय कायदा, बुलडोझर शिक्षेचा संविधान आणि न्याय यांच्याशी काहीही संबंध नाही.

## राहुल गांधीची सुनावणी एमपी एमएलए न्यायालयात

**पुणे :** स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य केल्याप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर दाखल असलेल्या फौजदारी तक्रारीची सुनावणी आता एमपी एमएलए या विशेष न्यायालयात होणार आहे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अमोल शिंदे यांच्या विशेष न्यायालयात ही सुनावणी होईल.

# पश्चिम बंगालमध्ये पुन्हा रेल्वे अपघात!

## मालगाडीचे पाच डबे रुळावरून घसरले

देशोन्नती वृत्तसंकलन

**अलीपुरद्वार :** पश्चिम बंगालमधील अलीपूरद्वार विभागातील न्यू मयनागुरी स्थानकावर मालगाडीचे पाच डबे रुळावरून घसरले. मालगाडी रिकामी होती, किमान पाच वॅगन्स रुळावरून घसरल्या होत्या. ही घटना मंगळवारी सकाळी घडली. या घटनेनंतर येथून जाणाऱ्या गाड्या पर्यायी मार्गाने वळवण्यात आल्या. रेल्वेने सांगितले की, रुळावरून घसरल्यानंतर गाड्या पर्यायी मार्गाने वळवण्यात आल्या असून वाहतुकीवर कोणताही परिणाम झालेला नाही. अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे पाच लाईनचे स्थानक असून या स्थानकावरील गाड्यांची वाहतूकही लवकरच पूर्ववत केली जाईल.



**तिरुपती :** आंध्र प्रदेशातील श्री व्यंकटेश्वर स्वामी मंदिराच्या शुद्धीकरणासाठी सोमवारी महाशांती होम (यज्ञ) करण्यात आला. तिरुमला तिरुपती देवस्थानम मंडळाच्या अधिकाऱ्यांसह २० पुजारी सोमवारी सकाळी ६ ते १० पर्यंत चाललेल्या पंचगव्य शुद्धीकरण होम प्रक्रियेमध्ये सहभागी झाले होते. या विधीदरम्यान लाडू आणि अन्नप्रसाद बनविण्यात येत असलेले स्वयंपाकघर शुद्ध करण्यात आले.

# निवडणूक आयोगाचे पथक झारखंडमध्ये

## विधानसभा निवडणूक पूर्वतयारीचा आढावा सुरू

देशोन्नती वृत्तसंकलन

**रांची :** झारखंड विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी निवडणूक आयोगाचे एक शिष्टमंडळ सोमवारी रांची येथे पोहोचले. या पथकामध्ये मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यास निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि डॉ. एस. एस. संधू यांचा समावेश आहे. दोन दिवसांच्या दौऱ्यावर आलेले हे पथक राजकीय पक्ष, अंमलबजावणी संस्था आणि




सरकारी अधिकाऱ्यांसोबत अनेक बैठका घेणार आहे. सोमवारी झालेल्या बैठकांदरम्यान निवडणूक आयोगाने ६ राष्ट्रीय आणि ३ प्रादेशिक पक्षांसह ९ पक्षांचे प्रतिनिधी तसेच वरिष्ठ प्रशासकीय आणि पोलीस अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

# रेस्टॉरंट्स, हॉटेल्स चालवणाऱ्यांसाठी नवीन आदेश

देशोन्नती वृत्तसंकलन

**लखनौः** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अन्नपदार्थांमध्ये मानवी टाकाऊ/ घाणेरड्या वस्तूंमध्ये भेसळ करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. देशातील विविध भागात घडणाऱ्या अशा घटनांची दखल घेत आज झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मुख्यमंत्र्यांनी राज्यातील सर्व हॉटेल/ढाबा/रेस्टॉरंट इत्यादी संबंधित आस्थापनांची कसून चौकशी, पडताळणी आदी सूचना



दिल्या आहेत. तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यकतेनुसार नियमांमध्ये सुधारणा करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

ढाबा/रेस्टॉरंट इत्यादी खाण्याच्या आस्थापनांची तपासणी करणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे. राज्यव्यापी सघन मोहीम राबवून या आस्थापनांच्या चालकांसह तेथे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची पडताळणी करण्यात यावी. अन्न सुरक्षा आणि औषध प्रशासन, पोलीस आणि स्थानिक प्रशासन यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई त्वरित पूर्ण करावी.

### नागरिकांच्या आरोग्यासाठी सुधारणा

**स्वच्छतेची काळजी घ्या- मुख्यमंत्री आदित्यनाथ योगी**

मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, अन्न केंद्रांमध्ये स्वच्छता असायला हवी. खाद्यपदार्थ बनवताना आणि सर्व्ह करताना संबंधित व्यक्तीने मास्क/ग्लोव्हज वापरणे आवश्यक आहे, यामध्ये कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा होणार नाही, याची काळजी घ्यावी.'असे त्यांनी म्हटले आहे.

# व्हॅटिकनच्या धर्तीवर नवा मुस्लीम देश

## अल्बानियाच्या पंतप्रधानांनी दिली माहिती

वृत्तसंस्था


**तिराना :** व्हॅटिकन सिटीला जगातील सर्वात छोटा देश मानले जाते. पोप तेथूनच ख्रिश्चन धर्माशी निगडित प्रकरणांवर मतप्रदर्शन करत असतात. व्हॅटिकनला सिटीला एका देशाचा दर्जा प्राप्त आहे. याच धर्तीवर एका मुस्लीम नेत्याने एक देश निर्माण करण्याचा प्रयत्न चालविला आहे. हा देश अल्बानियाची राजधानी तिरानामध्ये असेल. हा जगातील सर्वात छोटा देश ठरणार असून याचे क्षेत्र न्यूयॉर्कसिटीच्या ५ ब्लॉक इतके असते. येथे मद्यपानाला मंजुरी असेल आणि महिलांना पूर्ण स्वातंत्र्य असणार आहे. त्यांच्यावर राहणीनामाशी निगडित कुठलेच निर्बंध नसतील. अल्बानियाच्या २४ लाख लोकांपैकी १.१५ लाख लोक बेक्टाशी ऑर्डरला मानतात.



तिराना नावाने स्वतंत्र देश निर्माण करण्याचा प्रयत्न मौलवी एडमंड ब्रहीमाज यांच्याकडून केला जात आहे. बाबा मोंडी या नावाने ते ओळखले जातात. हा देश २७ एकरमध्ये निर्माण होणार असून ज्याला अल्बानिया एक स्वतंत्र देश म्हणून विकसित करण्यास तयार आहे. याचे स्वतःचे प्रशासन असेल. सीमा निश्चित होतील आणि लोकांना पासपोर्टही जारी केले जातील असा दावा त्यांनी केला आहे.

# बेताल वक्तव्य सामाजिक सलोख्याला घातक

## तत्परता खा.बजरंग सोनवणे यांनी दिले मुख्यमंत्र्यांना निवेदन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुस्लिम धर्मियांचे प्रेषित मोहम्मद पैगंबर (स.अ.) यांच्याविषयी समाजात काही लोक, वादग्रस्त वक्तव्य करत आहेत. परिणामी मुस्लिम धर्मियांच्या भावना दुखावल्या गेल्या असून सामाजिक सलोखा बिघडत चाललेला आहे. त्यामुळे कोणत्याही धर्माबद्दल बेताल वक्तव्य करणाऱ्या लोकांच्या विरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत. अशा मागणीचे निवेदन खा. बजरंग सोनवणे यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले.

समाजामध्ये संत म्हणतांनी आणि व्यक्तीवलय असलेल्या लोकांनी बंधुभाव जोपासावा लागतो. मात्र काही लोक मुस्लिम धर्मियांचे प्रेषित मोहम्मद पैगंबर तसेच अन्य धर्मिय यांच्याविषयी वादग्रस्त वक्तव्य करत आहेत.असे असतांना त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होत नाही. त्यामुळे सामाजिक सलोख्याला धोका निर्माण झाला आहे. राज्य सरकारने ही बाब लक्षात घेता वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात तातडीने योग्य ती कारवाई करावी. अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी निवेदनात केली. यावेळी ते असंही म्हणाले की समाजामध्ये एखादा संत महंत अशा प्रकारचे भावना पान २ वर...

### मुस्लिम बांधवांचे खा.बजरंग सोनवणे यांना निवेदने

राज्यात काही तथाकथित लोक समाजामध्ये दोन्ही निर्माण करत आहेत स्वतःला महाराज म्हणून घेणारे रामगिरी महाराज यांनी मुस्लिम धर्मियांचे प्रेषित मोहम्मद पैगंबर यांच्या विषयी अवमानकारक वक्तव्य केले आहे. या वक्तव्याचा बीड जिल्ह्यासह राज्यातील मुस्लिम समाज बांधवांकडून निषेध नोंदवला जात आहे. बेताल वक्तव्य करणाऱ्या व्यक्ती विरोधात आपण आवाज उठवावा.अशा मागणीचे निवेदने बीड जिल्ह्यातील मुस्लिम समाज बांधवांनी खा. बजरंग सोनवणे यांना दिले आहेत. या निवेदनाची दखल घेत त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ततातडीने निवेदन देऊन रामगिरी महाराजांवर कारवाई करण्याचे निर्देश द्यावेत अशी मागणी केली.

### मनोज जरांगे पाटील संदर्भात राज्यपाल, मुख्यमंत्र्यांना पत्र!

मराठा समाजाचं भलं व्हावं यासाठी स्वतःच्या जिवाची परवा न करता, मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील, अंतरवाली सराटीत आमरण उपोषणास बसले आहेत.त्यांची प्रकृती खालावत चाललेली आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने उपोषण सोडवावे अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दोन दिवसांपूर्वी पत्र पाठवून केली होती.खा.बजरंग सोनवणे सर्व जाती-धर्मांच्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी तत्परता दाखवत आलेले आहेत.

# केज अपहरण प्रकरणाला वेगळे वळण!

## निर्णय: न्यायालयाच्या निर्देशनाने ११ जणांवर गुन्हा




केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज शहरात काल अपहरण करते म्हणून काही युवकांनी आरोपी विजय भंडारी यास जबरदस्त मारहाण केली होती.आरोपी हा केज शहरात ताडी विक्रीचा अवैध व्यवसाय केल्याच नागरिकात चर्चा आहे.शाळकरी मुलाचे अपहरण करण्याच्या संशयावरून येथील मच्छीमार्केट परिसरात सोमवारी एकास पकडून त्याला बेदम मारहाण करून त्याची कार फोडून नुकसान केल्याप्रकरणी केज न्यायालयाच्या निर्देशानुसार एकूण ११ जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद झाला आहे. केज येथील भीमनगर भागात अंकुर मस्के याला चॉकलेटचे आमिष दाखवून त्याचे अपहरण करण्याच्या संशयावरून मारहाणीची घटना घडली होती. तर याप्रकरणी पोलिसांनी धनराज वळसे या केज, आणि विजय गोपीनाथ भंडारी या सनसर, जि. पुणे यांना ताब्यात घेऊन मंगळवारी केज न्यायालयात हजर गुन्हेगाराला केले. करण्याचा अधिकार शिक्षा न्यायालयाला आहे, परंतु जमावाने आपल्याला बेदम मारहाण करुन कार फोडल्याची कैफियत विजय भंडारी याने मांडली. यावर आरोपीची फिर्याद नोंदवून घेण्याचे आदेश केज न्यायालयाने दिले. त्यानुसार मारहाण करुन कार फोडणाऱ्या ११ जणांविरुद्ध गुन्हा नोंद झाला.यात शरद धिवार,शाबेर हबीब शेख परमेश्वर मस्के,दिपक मस्के व इतर सात आठ अनओळखीच्या लोकांवर गुर न.५०८/२०२४ कलम १८९(१२)१९२(२)१९१(३)१९०,११८,११५,३५२,३२४(४/५) या कलमानुसार केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# होळ एमजीबी बँकेसमोर उपोषण

## आंदोलन: खाते होल्ड काढा, योजनांचा लाभ द्यावा!



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेत मनमानी कारभार सुरू असल्याने सर्वसामान्य माणूस त्रस्त झाले आहेत कारण महाराष्ट्र ग्रामीण बँके खाते दाराचे खाते होल्ड केल्यामुळे खाते दाराच्या खात्यात जमा झालेली रक्कम पीकविमा किसानचे रक्कम, रिटायर कर्मचारी पगार, पीऐम किसान पागार रक्कम मिळत नसल्याने गणेश लाड २५/०९/२०२४ पासुन अमरण उपोषणाला बसले आहेत या विषयी सविस्तर वृत्त असे की गणेश लाड यांची मागणी अशी आहे की होळ येथील महाराष्ट्र ग्रामीण बँकेने शेतकऱ्यांचे खाते होल्ड केल्यामुळे आम्हा शेतकऱ्यांना शासनाना कडुन मिळणाऱ्या पीऐम किसान, पीकविमा अनुदान, तसेच इतर सुविधेची रक्कम मिळत नाही त्या योजनांचा लाभ देण्यात यावा तसेच याबाबत विचारणा केली असता बैंक कर्मचाऱ्यांन कडुन शेतकऱ्यांना धमकावले जाते आहे अरेरावीची भाषा पान २ वर...

# कार्यकर्त्यांचा मेळावा घेवून निर्णय

## अशोक डक: निवडणूक वातावरण तापले



माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या होऊ घातलेल्या विधान सभेच्या निवडणुकी उतरून विधानसभा मीच लढवावी या कार्यकर्त्यांच्या आग्रहातर माजलगाव मतदार संघातील सर्व कार्यकर्त्यांचा दि.२८रोजी मेळावा घेणार असल्याचे मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक यांनी माहिती दिली. माजलगाव मतदार संघातील राष्ट्रवादी पक्षाचे आ.प्रकाश सोळंके यांनी मी विधानसभा लढवणार नसल्याच्या केलेल्या घोषने वरुन माझे माजलगाव विधानसभा मतदारसंघातील हितचिंतक कार्यकर्ते यांनी तुम्ही आगामी विधानसभा निवडणुकी साठी खरे दावेदार असुन कोणत्याही परिस्थितीत आपणच माजलगाव विधानसभेची निवडणूक लढवावी असा माझ्यावर दबाव निर्माण केल्याने मी मतदारसंघातील सर्व हितचिंतक कार्यकर्ते यांचा मेळावा घेण्याचा मानस करुन दि.२८रोजी शनिवारी माझ्या निवास स्थानी सदरील मेळावा पान २ वर...

# वडवणीत दोन दिवसीय पोषण अभियान

## उपक्रम: मल्टीमीडिया चित्र प्रदर्शनाचे आयोजन




वडवणी/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाअंतर्गत केंद्रीय संचार ब्यूरोच्या वतीने तसेच बीड जिल्हा परिषद, बीड तहसील कार्यालय आणि बीड पंचायत समिती कार्यालय यांच्या सहकार्याने वडवणी तालुका येथे दोनदिवसीय पोषण अभियान मल्टीमीडिया चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रचे उद्घाटन बीडचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाने, वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे, तहसीलदार वैभव महेंद्रकर, नीती आयोगाचे आकांक्षीत तालुका फेलो सुदर्शन राख, महाराष्ट्रातील नामवंत वक्ते वृक्षमित्र सुधाकर देशमुख यांच्यासह प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

केंद्र सरकारमधील निती आयोगाच्या वतीने यंदा देशभरात संपूर्णता अभियान राबवण्यात येत आहे. या अभियानामध्ये आकांक्षित तालुका म्हणून बीडमधून वडवणी तालुक्याची निवड करण्यात आली होती. याअंतर्गत जुलै ते सप्टेंबर महिन्यादरम्यान वडवणी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पोषण अभियान मल्टिमीडिया चित्र प्रदर्शनाच्या निमित्ताने आकांक्षित तालुका उपक्रमाचीही सांगता करण्यात आली. यावेळी वडवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी राबविण्यात आलेल्या विविध योजनांची माहिती दिली. देशभरात सप्टेंबर महिन्यात पोषण माह सप्ताह विषयक कार्यक्रमांचेही पान २ वर...

# मराठ्यांनो नमीताला पून्हा संधी नको

## संतप्त: केजमध्ये मराठा समाजाचा निर्णय



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई विधानसभा मतदारसंघाच्या विद्यमान आमदार नमीता मुंदडा यांनी मराठा योध्दे मनोज जरांगे पाटील यांच्या अमरण उपोषना संदर्भात प्रतीक्रीया देत नाहीत तसेच पाठींबा सुध्दा दीला नाही तसेच आमदारा सासरे मराठा आरक्षणा विषयी प्रश्न विचारले तर गरळ ओकत आहेत कारळ कालवुन पुढे जात आहेत तर आमदारा नमीता मुंदडा यांचे सुध्दा वागने आरक्षणाविषयी सासऱ्या सारखेच आहे त्यामुळे आमदारा नमीता मुंदडा येणाऱ्या काळात आमदारा करायचे नाही अशा भावना मराठा बांधव मधुन व्यक्त केल्या जात आहेत.तसेच आमदारा नमीता यांनी इतर समाजाच्या आरक्षणाला पाठिंबा दिला आहे परंतु आमदार नमीता यांनी मराठा आरक्षणासाठी पाठीब्याचे पत्र का दिले नाही आमदारा नमीता यांना मराठ्यांच्या दाराला जानार नाही का असा प्रश्न मराठा बांधवांना उपस्थित होतो आहे तसेच विद्यमान आमदार नमीता यांना मराठा आरक्षणाला पाठिंबा देण्यासाठी लाज वाटते का जर असे असेल तर मराठा समाजाच्या पंगतीला बसून जेवताना, मराठा समाजाच्या दाराला मते मागण्यासाठी जातांना पन आमदारा नमीता व सासरे बुवा यांना लाज वाटत नाही असा प्रश्न मराठा बांधवांना उपस्थित होतो आहे त्यामुळे येणाऱ्या विधानसभेत आमदार नमीता यांना मराठा समाजाने निवडणून तर मराठा समाजाच्या गावात सुध्दा फिरायचे नाही अशा भावना केज तालुक्यातील मराठा बांधवांन कडुन व्यक्त केल्या जात आहेत.

# मांजरा धरण पूर्ण क्षमतेने भरले!

## दिलासा: नदी काठच्या गावांना सतर्कतेचे आवाहन



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यासह तीन जिल्ह्यांची तहान भागवणारे मांजरा धरण आज दि. २५-०९-२०२४ रोजी सकाळी ठीक १०.००वा. मांजरा धरण ९६.०५% क्षमतेने भरला असून पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसामुळे धरणात होणारी पाण्याची आवक पाहता धरण पाणी पातळी नियंत्रित करण्याचे दृष्टीने आज दि. २५/०९/२०२४ रोजी ठीक १२:३० वाजता मांजरा प्रकल्पाचे २ वक्रद्वारे ०.२५ मीटर उंचीने उघडून मांजरा नदीपात्रात १७३० क्यूसेक्स ४९.०० क्यूमेक्स इतका विसर्ग सोडण्यात येणार आहे.तसेच धरणात पाण्याची होणारी आवक पाहता विसर्ग कमी अथवा जास्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल तरी, मांजरा नदी काठावरील/ पुरामुळे बाधित होणाऱ्या गावातील नागरीकांनी सतर्क रहावे. कोणीही नदीपात्रात प्रवेश करू नये व कुठलीही जिवीत अथवा वित्त हानी होणार नाही याची खबरदारी घ्यावी,नदीकाठच्या गावांनी सतर्क रहावे असे आवाहन पुरनियंत्रण कक्ष यांनी केले आहे.मांजरा धरण हे गेली तीन ते चार वर्षानंतर पुर्ण क्षमतेने भरलेले आहे या धरणावर पिण्याच्या पाण्यासाठी बीड धाराशिव व लातुर च्या मोठ्या प्रमाणात अवलंबुन आहेत भर पावसाळ्यात अजुन धरण भरले नव्हते आज प्रदिर्घ प्रतिक्षेनंतर आज पुर्ण क्षमतेने भरले व नदी पात्रात पाणी सोडण्यात आले हे भरले नदी काठचे शेतकरी समाधानी झालेले दीसुन येत आहेत.

# जुना मोंढा रोडचे काम त्वरित करा

## जयदत्त क्षीरसागर: बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

अनेक वर्षापासून बीड शहरातील सह्याद्री हॉस्पिटल ते जुना मोंढा रोडच्या कामाची मागणी असून हे काम विशिष्ट योजनेतून मंजूर झालेले काम तातडीने सुरू करावे अशा प्रकारचे निवेदन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना दिले असून हे काम झाल्यास ऐन सणासुदीत नागरिकांची गैरसोय होणार नाही.

बीड शहरातील विविध रस्त्यांची कामे झाली असून सह्याद्री हॉस्पिटल ते जुना मोंढा हे काम खूप दिवसापासून रखडलेले आहे. हे काम व्हावे यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू होता. अनेक वर्षापासूनची या भागातील नागरिक, व्यापारी यांची मागणी होती. मुख्य रस्ता आणि वर्दळीचे दळणवळण याच रस्त्यावरून असल्यामुळे हे काम व्हावे यासाठी प्रयत्न सुरू होते, विशिष्ट योजनेतून मंजूर झालेले हे काम तातडीने व्हावे अशा प्रकारची मागणी या भागातील नागरिकांनी आणि विविध व्यापारी संघटनांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्याकडे केली होती. त्यानुसार माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सह्याद्री हॉस्पिटल ते जुना मोंढा हे काम तातडीने सुरू करावे अशा प्रकारचे निवेदन दिले असून येणार्या नवरात्र, दसरा आणि दिवाळी सणापूर्वी हे काम व्हावे असा आग्रह आहे हे काम झाल्यास व्यापारी,नागरिक आणि खंडेश्वरी दर्शनासाठी, ग्रामीण भागात जाणार्यासाठी सोय होणार आहे.

## नियोजन दिवसभर शाळा भरविल्याने ग्रामस्थांतून कौतूक

# शेकटामध्ये ट्रेनि शिक्षकांनी भरवली शाळा




बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडील शिक्षक संचमान्यतेत बाबत दि.१५/०३/२०२४ चा व कंत्राटी शिक्षक भरती बाबतचा दि. ०५/०९/२०२४ चा शासन निर्णय वाडीवस्तीवरील विदयार्थ्यांवर अन्यायकारक असल्याने सदरचे दोन्ही शासन निर्णय रद्द करावेत या मागणीसाठी २५ सप्टेंबर रोजी राज्यातील सर्व शाळा बंद ठेवून जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी बीड जिल्ह्यातील सर्वच शाळा या बद ठेवण्यात आल्या असताना देखील गेवराई तालुक्यातील शेकटा जिल्हा परिषद शाळेमध्ये नव्याने नियुक्त झालेले ट्रेनि शिक्षक प्रा. तुकाराम महानोर, सचिन गडदे यांनी जिल्हा परिषदेची शाळा नियमित भरवून तसेच शाळेतील नियमित तासिका घेत शाळा सुरू ठेवल्याने ग्रामस्थांमधून त्यांच्या या कामाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नारायणकर यांनीही यावेळी कौतुक केले.

महाराष्ट्रातील सर्वच शिक्षक संघटनांनी या बंदमध्ये सहभाग नोंदविल्याने महाराष्ट्रातील शाळा या दि. २५ सप्टेंबर रोजी बंद असल्याचे पहायला मिळाले. यामुळे विद्यार्थ्यांची मात्र मोठी गैरसोय झाली. सद्य परिस्थितीमध्यें महाराष्ट्रातील शाळा या कायम काही ना काही कारणास्तव बंद ठवेण्याचे निर्णय घेतण्यात येत असल्याचे दिसून येते. यामुळे मात्र विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकासानही मोठ्या प्रमाणात होते. मात्र यावेळी चक्क शिक्षकांनीच बंद ठेवल्याने शाळा बंद राहिल्या. मात्र गेवराई तालुक्यातील शेकटा येथील जिल्हा परिषद शाळा ही नियमित दिवसभर पान २ वर...

### ग्रामस्थांकडून कौतुकाची थाप

गेवराई तालुक्यातील शेकटा येथील जिल्हापरिषदेची शाळा २५ सप्टेंबर रोजीच्या बंदच्या दिवशीही नियमित भरल्यामुळे ग्रामस्थाकडून ट्रेनि शिक्षक प्रा. तुकाराम महानोर, सचिन गडदे, यांचे पालकांकडून व गावातील शिक्षणप्रेमींकडून अभिनंदन करून त्यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी गावातील अनेक शिक्षणप्रेमीनीही शाळेज हजेरी लावली होती.

# प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करा

## आ.संदिप क्षीरसागर : तालुका प्रशासनाच्या घेतल्या बैठका



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड मतदारसंघात जलसंधारण, जलसंपदा, जलजीवन मिशन विभागाशी संबंधित कामांच्या बाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी सदरील विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन विविध सूचना दिल्या. तसेच फुलसांगवी येथील आंदोलनच्या अनुषंगाने जिल्हा जलसंधारण अधिकारी व जायकवाडी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांना निर्देश दिले.

बीड मतदारसंघातील अनेक गावांमध्ये जलजीवन मिशन अंतर्गत कामे सुरू आहेत. परंतु ही कामे अनेक ठिकाणी प्रलंबित आहेत. तसेच मतदारसंघात जलसंधारण, जलसंपदा विभाग यांच्याशी संबंधित नागरीकांच्या काही अडचणी आणि मागण्या होत्या याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि.२४) रोजी बीडमध्ये शासकीय विश्रामगृह येथे जलसंधारण, जलसंपदा, पाटबंधारे विभाग, जलजीवन मिशन, ग्रामीण पाणीपुरवठा पान २ वर...